# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.03.2024** **वारःशनिवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या तारखा आज जाहीर होणार
2. प्रमाण वेळ निश्चितीसाठी आवश्यक यंत्रणेचं केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांच्या हस्ते लोकार्पण
3. एसटीच्या डिझेल गाड्यांचं एलएनजीवर चालणाऱ्या गाड्यांमध्ये रुपांतरण करण्याच्या प्रकल्पाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
4. शेतकऱ्यांच्या एक लाख 60 हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचं मुद्रांक शुल्क माफ करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा आणि
5. राज्यात शालेय विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही गणवेशाचं बंधन लागू होणार

**<u>लोकसभा निवडणूक</u>**

आगामी लोकसभा निवडणूकीचं वेळापत्रक केंद्रिय निवडणूक आयोग आज जाहीर करणार आहे. त्यानंतर लगेचच निवडणूक आचारसंहिता लागू होईल. नवी दिल्लीत होणाऱ्या पत्रकार परिषदेत, काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचं वेळापत्रक देखील जाहीर केलं जाणार आहे. यावेळीही लोकसभा निवडणुकीसाठीचं मतदान एप्रिल आणि मे महिन्यात वेगवेगळ्या टप्प्यात होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत सत्ताधारी भाजपानं 267 तर काँग्रेसनं 82 उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. डावे पक्ष, आप, टीएमसी आणि इतर काही राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. दरम्यान, ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू यांनी काल निवडणुक आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी त्यांचं कार्यालयात स्वागत केलं.

**<u>निवडणूक रोखे</u>**

स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांबाबत दिलेली माहिती अपुरी असल्याचं सांगत, याबाबत रोख्यांच्या क्रमांकांची माहिती सोमवारपर्यंत द्यावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल स्टेट बँकेला दिले. या संदर्भात न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रांची प्रत मागणारा अर्ज आयोगानं सर्वोच्च न्यायालयात दाखल केला होता. त्यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या खंडपीठानं हे आदेश दिले. निवडणूक रोख्यांच्या निधीबाबत माहिती जाहीर करण्यात आली. पण त्यामध्ये कोणत्या खरेदीदारानं कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, हे मात्र स्पष्ट नाही.

**<u>प्रमाणवेळ</u>**

देशभरात प्रमाण वेळ निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या National Time Protocol चं लोकार्पण केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री पीयुष गोयल यांनी काल मुंबईत केलं. यामुळे देशभरात सर्वत्र एकसमान आणि मिलीसेकंद पातळीवरची अचूकता दर्शवणारी वेळ कळू शकेल. नागरिकांना time.npl india.org किंवा time.nplindia.in या संकेतस्थळावरून अचूक वेळ समजून घेता येईल. देशभरातल्या रेल्वे, विमानतळ आणि बँकांमधील वेळ एकसमान होणार असल्यानं सायबर सुरक्षा वाढायला यामुळे मदत होईल. यासाठी अहमदाबाद आणि फरिदाबाद इथल्या क्षेत्रीय प्रयोगशाळांमध्ये उभारलेल्या पायाभूत सुविधांचं लोकार्पणही गोयल यांनी केलं.

**<u>मुख्यमंत्री-एस.टी</u>**

राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्यांचं, द्रवरुप नैसर्गिक वायू म्हणजेच एलएनजी वर चालणाऱ्या गाड्यांमध्ये रुपांतरण करण्याच्या प्रकल्पाचं उद्घाटन, काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. परिवहन महामंडळाकडे डिझेलवर चालणारी सुमारे 16 हजार प्रवासी वाहनं आहेत. या प्रकल्पात, सुरुवातीला 5 हजार डिझेल वाहनांचं एलएनजीवर चालणाऱ्या वाहनांमध्ये रुपांतरण करण्यात येणार आहे. नंतर टप्प्याटप्प्यानं महामंडळाच्या ताब्यातल्या सर्व वाहनांचं रुपांतरण करण्यात येईल. महामंडळाच्या सुमारे 90 आगारात एलएनजी वितरण केंद्रही उभारण्यात येणार आहे.

**<u>मुद्रांक शुल्क माफी-मुंबई</u>**

शेतकऱ्यांच्या एक लाख 60 हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचं मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केली. बीड जिल्ह्यात किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटल प्रकल्पाचा-जनसमर्थचा प्रारंभ दूरस्थ माध्यमातून करताना ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जिल्ह्यातल्या 22 शेतकऱ्यांच्या खात्यात किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून थेट रक्कम जमा करण्यात आली. डिजीटल क्रांतीचा वापर शेतकऱ्यांसाठी आणि कृषि क्षेत्रासाठी करण्याचा हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणणारा ठरेल असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. जनसमर्थ प्रणालीद्वारे, शेतकऱ्यांना कागदपत्र विरहीत आणि घरबसल्या अल्पमुदतीच्या कर्जासाठी अर्ज करता येईल. याशिवाय या ऑनलाईन ओळखपत्रामुळे शासनाच्या अन्य योजनांसाठीही अर्ज करणं आणि लाभ घेणं सुलभ होणार आहे.

**<u>मुख्यमंत्री पत्रकार</u>**

राज्यातल्या ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान निधी अकरा हजारावरून वीस हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यासंदर्भात अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी मागणी केली होती. वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालया मार्फत आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना हा निधी दिला जातो.

**<u>मतदान जनजागृती</u>**

लोकसभा निवडणुकीच्या तारखा आज जाहीर होणार आहेत. या निवडणुकीत नागरिकांनी मोठ्या संख्येनं मतदान करावं यासाठी विविध माध्यमातून मतदानाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. मतदानाचं कर्तव्य बजावण्याचं आवाहन करताना पाककला तज्ज्ञ विष्णू मनोहर म्हणाले....

**<u>दिव्यांग मतदान-परभणी</u>**

परभणी जिल्ह्यात दिव्यांग मतदारांचा मतदानातला सहभाग वाढवण्यासाठी काल दिव्यांग मतदान जनजागृती अभियान आणि दिव्यांग रॅली काढण्यात आली. 40 टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या घरी जाऊन मतदान करुन घेतलं जाणार आहे, तसंच दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवर सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. निवडणूक आयोगाच्या सक्षम ॲपचीही यात मदत होणार असल्याचं जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी यावेळी सांगितलं.

**<u>शिक्षक गणवेश-मुंबई</u>**

शालेय विद्यार्थ्यांप्रमाणं आता राज्यातल्या सर्व शिक्षकांना विशेष गणवेश लागू करण्यात येणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. यापुढे सर्व शिक्षकांना त्यांच्या नावापुढे टीआर म्हणजे शिक्षक अशी पदवी लावता येणार आहे. यातून या व्यवसायाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा मानस असल्याचं केसरकरांनी सांगितलं.

**<u>अदिती तटकरे-रत्नागिरी</u>**

अंगणवाडी सेविकांना निवृत्तीवेतन देण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन राज्याच्या महिला आणि बालविकासमंत्री अदिती तटकरे यांनी काल दिलं. रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेडमधे तटकरे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविकांना मोबाइल वाटप करण्यात आलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. वीज नसलेल्या अंगणवाड्यांमध्ये सौर ऊर्जेची सोय केली जाणार असून, त्यासाठी पहिल्या वर्षी 36 हजार अंगणवाड्यांचं उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>दशावतारी कला-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुरत्न योजनेतून सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या 30 दशावतार नाट्य मंडळांना वाहन आणि इतर साहित्य देणार असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हा संघटक रुपेश पावसकर यांनी दिली. ते काल कुडाळ इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. वाहनांसाठी या मंडळांना 90 टक्के अनुदान मिळणार आहे. स्वतःच वाहन मिळणार असल्यानं दशावतार लोककला आता दूरदूरच्या नाट्य रसिकांना पाह्यला मिळू शकते. त्याच बरोबर या नाट्यकलेसाठी लागणाऱ्या साहित्यासाठी सुद्धा सिंधुरत्न मधून निधी दिला जाणार आहे, असं पावसकर म्हणाले.

**एकनाथ खडसे-मुंबई**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी रावेर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट निवडणूक लढवणार असून, आपण स्वतः किंवा रोहिणी खडसे ही निवडणूक लढणार नसल्याचं आमदार एकनाथ खडसे यांनी जाहीर केलं आहे. तब्येतीच्या कारणामुळे निवडणूक लढणार नाही असं खडसे काल म्हणाले. मुंबईत शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला.

**शौर्याथॉन**

सरहद शौर्याथॉन-2024 स्पर्धेच्या बोधचिन्हाचं आणि संकेतस्थळाचं अनावरण काल मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. सरहद पुणे, भारतीय लष्कर आणि अर्हम संस्था पुणे यांच्यातर्फे येत्या 30 जून रोजी ही स्पर्धा होणार आहे. जम्मू काश्मीरमधल्या झोजिला युद्ध स्मारक ते कारगिल युद्ध स्मारकादरम्यान होणाऱ्या या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत भारतासह विविध देशातले धावपटू सहभागी होतील. झोजिला युध्दातल्या विजयाचा अमृत महोत्सव आणि कारगिल युध्दातल्या विजयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**हॉकी**

पिंपरीच्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर सुरू असलेल्या 14व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेचा कालचा तिसरा दिवस हरियाणा संघाने गाजवला. हरियाणाने आसाम हॉकीचा 15-0 अशा फरकाने धुव्वा उडवला. अन्य एका सामन्यात असोसिएशन ऑफ ओडीशाने गोवन्स हॉकीवर मात करत आपला पहिला विजय साकार केला. याखेरीज हॉकी पंजाब संघानेही चमकदार विजय मिळवला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात आज हवामान कोरडं राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.